# संपादकीय

श्री दीपलक्ष्मी दिवाळी अंकाचे हे ४७ वे वर्ष आहे. २००७ साली दिवाळी अंकांची शताब्दी व 'श्री दीपलक्ष्मी'चे सुवर्णमहोत्सवी वर्ष सुरु होणार आहे. दरवर्षी ३०० ते ३५० दिवाळी अंक बाजारात येत असतात. या दिवाळी अंकांची, वाचक आतुरतेने वाट पाहत असतात. प्रत्येकी १०० ते १५० पाने धरली तर ३०० अंकांची ३०,००० ते ४०,००० पाने, म्हटली तर वाचकांना उपलब्ध आहेत. तऱ्हेतऱ्हेचे विषय, नव्या कल्पना प्रत्यक्षात उतरवून अंकांची निर्मिती केली जाते. प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे सुमारे १०,००० माणसे हंगामी का होईना पण ह्यात गुंतलेली असतात. दसऱ्यापासून ते दिवाळीपर्यंत संपूर्ण महाराष्ट्रात तसेच गुजरात, गोवा, मध्यप्रदेश आणि परदेशीही जेथे जेथे मराठी माणूस आहे तेथे दिवाळी अंक आवर्जून मागविला जातो. बंगाल (शारदीय शंख) केरळ (ओनम) सोडून हा दिवाळी अंकांचा उपद्व्याप जगात खचितच होत असेल. इतक्या संख्येने अंक प्रसिद्ध होण्याचे प्रमाण दुसऱ्या कोणत्याही भाषेत नाही. म्हणजेच मराठी माणूस हा अंक हौसेखातरच काढतो. दिवाळी अंकांचे साहित्यिक मूल्य, म्हणून दर्जा निश्चितच वरचा आहे एक अंक २५ ते ३० जण वाचत असल्याने वाचनीयताही मोठी आहे. हे सर्व सांगण्याचे प्रयोजन हे की, १०० वर्षे चाललेली ही परंपरा मराठी मनाला व माणसाला निश्चितच अभिमानास्पद आहे.

यंदाच्या 'श्री दीपलक्ष्मी'च्या दिवाळी अंकात डी. व्ही. कुलकर्णी यांची वेगळ्या विषयावरील दीर्घ कादंबरी, कथा, आत्मकथन तसेच हास्यचित्रे आहेतच. त्याशिवाय दोन खास परिसंवादही. 'गोष्टी आजी-आजोबांच्या ह्या परिसंवादात 'श्वास' ह्या बहुचर्चित चित्रपटाच्या निमित्ताने नातवंडे व आजी-आजोबा ह्यांच्या नात्याचा वेध घेण्याचा प्रयत्न केला आहे. त्यात मान्यवरांबरोबरच टिपरे मालिकेतील नातू विकास कदम व उद्योगपती भंवरलाल जैन यांनी सांगितलेला त्यांच्या सात नातवंडांचा संस्कारवजा लेख व खुद्द 'श्वास'चा नायक अश्विन चितळे ह्याचेही मनोगत आहे. डॉ. सुभाष भेण्डे, प्रा. प्रवीण दवणे ह्यांनी ह्या नात्याची वेगळी बाजू मांडलेली आहे. वसंत गोवारीकर, प्रतिभा शाहू मोडक, ह. वि. सरदेसाई इत्यादींना आत्मचरित्र लिहिण्यासंबंधी बोलते केले आहे. तसेच आय आय टी ह्या जगद्विख्यात संस्थेचा तेथे प्रत्यक्ष जाऊन पराग पाटील यांनी सखोल वृत्तांत लिहिलेला आहे.

सुरैय्या ह्या गायक अभिनेत्रीचा खास बाबू मोशाय शैलीतील दीर्घ लेख जुन्या पिढीतल्या वाचकांना खिळवून ठेवणारा आहे... पुण्यातील उपनगरात ४/५ वर्तमानपत्रे (पाक्षिक) प्रसिद्ध करुन मोफत वाटून एक वेगळा पायंडा पाडणाऱ्या उपक्रमाबद्दल 'माध्यम परीसर' ह्या लेखात जाणवेल. पाकिस्तानला जाऊन आलेल्या सुप्रिया संझगिरींचा लेख पाकिस्तानकडे बघण्याचा नवीन दृष्टिकोन वाचकांना देईल. दरवर्षीप्रमाणे डॉ. समीर जोग ह्यांचा कथालेख 'देहांतांची षट्दर्शने' हा आहेच.

गेल्यावर्षीच्या अंकातील श्री. विठ्ठल कामत यांचे आत्मचरित्र गाजले होते. ह्यावर्षी श्री. सुधीर निरगुडकर यांचे आत्मचरित्रही आपणांस भावे.

आपल्या अनुकूल/प्रतिकूल प्रतिक्रिया आमची उमेद वाढवतील.

आपला,
हेमंत ग. रायकर
(संपादक)
**Email : shreedeeplaxmiclassic@yahoo.co.in**

गोष्टी आजी आजोबांच्या



# एक आजोबा अन् सात नातवंडं...


- आनंद गुप्ते

या माणसाला 'आजोबा' हे नाव तसं पहाता हल्ली हल्लीच मिळालंय. म्हणजे जगाच्या दृष्टीकोनातून हा नवा कोरा, ताजा ताजा आजोबा आहे. याचाच दुसरा अर्थ म्हणजे हा तसा 'अनुभवी' आजोबा आहे. ही आजोबांची भूमिका पार पाडण्याचा त्याला फार जुजबी अनुभव आहे. पण याला त्याचा नाइलाज आहे कारण नियतीनंच तशी रचना केलेली असावी. पण सर्वात आश्चर्याची बाब अशी की त्याचं 'आजोबा' या भूमिकेतलं वागणं मात्र एकदम मुरब्बी आजोबांनाही लाजवेल असं आहे. कोणत्याही भुमिकेत, कामात हात घालण्याआधी त्याचा परिपूर्ण, खोलवर आणि ताजा ताजा अभ्यास करण्याची जी याची खोड रक्तात मुरलीय ना, तिचाच हा परिणाम. म्हणून या आजोबानं आपल्या या नव्या भूमिकेचा तसा अभ्यास केलेला असावा. म्हणूनच या आजोबाला खिंडीत पकडणं त्याच्या नातवंडांना फार फार कठीण जात असावं. तसा प्रत्ययही येतोच. भवरलाल हिरालाल जैन हे त्याचं नाव.

या अजोबाचं बाळपण गरिबीत गेलं. त्याचे आईवडील शेतकरी. वाच्यार्थानं अशिक्षित. पण 'अडाणी' नव्हे हं! लिहिता-वाचता येत नव्हतं. म्हणून लौकिक अर्थानं म्हणायचं अशिक्षित. पण जगाच्या बाजारातलं भरपूर ज्ञान त्यांनी जमवलं होतं. जगायचं कसं यापेक्षा जगवायचं कसं याचंच शिक्षण त्यांनी आपल्या मुलाबाळांना दिलं. ते बाळकडू घेऊन हे आजोबा स्वत: वाढले. खूप खूप शिकले. उद्योगधंद्यात नाव लौकिक अन वैभव मिळवलं. आता ते त्यांचं संचित नातवंडांना वाटण्यासाठी सरसावलेत. मागील पिढ्या पुढील पिढ्यांना नेहमीच देऊ पाहतात ते हेहि आजोबा देताहेत. भरभरून देताहेत.

बाहेर उजाडलं, फटफटलं, झुंजू-मुंजू झालं की आजोबा बाहेर पडतात फिरायला. ही वेळ ऋतुमानाप्रमाणंच साहजिकच बदलत असते. म्हणजे उन्हाळ्यात दिवस मोठा असतो तेव्हा सकाळी साडेपाचलाच प्रभातफेरी चालू होते तर हिवाळ्यात जेव्हा दिवस लहान असतो तेव्हाती सकाळी साडेसहानंतर चालू होत असते. बळजबरीनं झक्कू लावून, आरडाओरडा करू उठवलेली नातवंड या आजोबांच्या मागोमाग एक एक करत बाहेर येतात. त्यांच्या डोळ्यांवरची झोप उडालेली नसते. त्यामुळे फिरण्याचे बूट पायात नीट घालण्याचे कामी त्यांची चालढकल जाणवते. समोर उभ्या असलेल्या व्हॅनमध्ये केव्हा एकदा बसेन अशी त्यांची गडबड असते. त्याउलट त्यांना केव्हा एकदा पळायला. जॉगिंग करायला लावेन अशी आजोबांची लगबग असते. कधी यांचा विजय तर कधी त्यांची सरशी. पण आजोबांचा फतवा अंतीम मानला जातो व त्यानुसारच वागणं होतं. नातवंडांची वयं पहाता त्यांच्या जाहीर कुरकुरीकडं जाणीवपूर्वक दुर्लक्ष केलं जातं. सर्व नातवंडांनी किमान एक फर्लांग तरी पळावं अशी सक्ती असते. नातवंडातल्या बिलंदरांच्या कमी पळण्याच्या, हळू पळण्याच्या, मध्येच झुडपामागं लपून राहण्याच्या, मध्येच थांबण्याच्या सर्व युक्त्या प्रयुक्त्यांकडे एका ठराविक मर्यादेपर्यंत आजोबा जाणून बुजुन दुर्लक्ष करतात आणि कधी काळी एकाएकी आणखी एक धाव सक्तीची करून त्यांच्या तोंडचे पाणी पळवतात. पण सुरुवातीची धाव जर व्यवस्थित पूर्ण झाली तर मात्र पुढचे २-३ कि. मी. चालणं आरामात राहतं. या प्रभातफेरीला पर्याय नसतो. पाऊस असेल तर छत्री घ्या. थंडी असेल तर स्वेटर्स घाला. पहाटेही गरम होत असेल तर शर्ट-टी शर्ट काढा. पण पळा. चाला.

नातवंडांना लौकर उठायची संवय लावणं, खुल्या ताज्या हवेत व्यायाम घडवणं, भावंडांच्या साहचर्याची संवय लावणं एवढेच हेतू केवळ आजोबा बाळगतात असं नव्हे तर जाता येता, चालत असता पिकांची झाडांची वाढ, मोहोर, रोग, छाटणी, कलम, औषधोपचार पाहणं चालू असतं. विहिरींमधील पाण्याची पातळी पाहणं आजोबांना आवडतं तर नातवंडांना त्याच विहिरीमधील विरोळा पाहणं, खेकडे अन बेडकांचा वेध घेणं, त्यांना वरून दगड मारणं यात रस असतो.



कधी काळी वर्षा-सहा महिन्यातून एखादा पक्षी मेलेला सापडला तर आजोबांचा डोळ चुकवून ही नातवंडांची गँग त्याला उचलते, त्याची पिसं जमवून वही-पुस्तकातून ठेवते. आजोबांच्या प्रात:फेरीत नित्यानं सामील होणाऱ्या मित्रमंडळींपैकी एक-दोघा फुटिरांना जरा पुढे वा जरा मागं खेचून त्यांचेकडून छत्रपती शिवाजी महाराजाच्या, पेशवाईच्या, रामायण-महाराभरातल्या गोष्टी वसूल करण्यातही हा बाल चमू वाकबगार आहे. तसंच खरंखुरं दमल्यावर वा दमल्याचं सोंग घेऊन का म्हणा पण आजोबांना पटवून ही प्रभात फेरी जरा अंमळच आवरती घेऊन छू बाल्या करण्याचं तंत्र या नातवंडांनी अत्यंत कौशल्यानं आत्मसात केलंय.

कधीतरी बदल म्हणून बाळगोपाळांनी पायात चाकांचे बूट स्केटस घातले. धपाधप पडण्याला उत्तम निमित्त मिळालं. आजोबांनी त्यांना स्केटिंग शिकवायला ट्रेनर आणला. डोक्यावर हेल्मेटस आणली. गुडघे फुटून दुखापती होऊ नये म्हणून खास पॅड्स आणली. थोड्याच दिवसात उतारावरच्या कॉंक्रीट रस्त्यांवर पोरं भन्नाट स्पीडनं जाऊ लागली. मग एकेकाची वेगळी छोटी स्कूटर आली. पुढं मग सायकली आल्या. हल्ली हल्लीच एक स्कूटीही या ताफ्यात आलीय. बाळगोपाळांच्या हौशी भागवत असतानाच त्यांना धीट बनवण्याचं काम चालूच आहे. सकाळच्या फेरीत कधीकधी आवरतं घेऊन सर्व नातवंडांना एकत्रितरित्या पोहायला नेलं जातं. तिथं याला पोहता येतं आणि त्याला येत नाही, असा फरक वर्ज्य असतो. त्यामुळं न पोहता येणारी पोरंटी हा हा म्हणता पोहायला लागतात. त्यांनी पाण्यात रमावं म्हणून मग त्यांना पाण्यात तरंगणाऱ्या फुगवलेल्या ट्यूब्ज, फुगे, चेंडू दिले जातात. स्वत: आजोबा उत्तम पोहणारे आहेत म्हणून तेही मुलाबाळात पाणी उडवायला उतरतात व चंगळ करतात.

कधिकधी शिरसोली रस्त्याच्या पलिकडच्या बाजूस असणाऱ्या डिव्हाइन पार्कची सहल निघते. भली मोठी उंचच्या उंच सरळ सोट टेकडी उभी आहे तिथं. संपूर्णपणे मुरमाची. मग कमितकमी वेळात सरळ टेकडी चढण्याची शर्यत लावली जाते. प्रत्येक स्पर्धकाची वेळ नोंदण्यात येऊन क्रमांक दिले जातात. नंतर टेकडी त्याच रस्त्याने उतरण्याचीही स्पर्धा होते. तिथंही क्रमांक दिले जातात. अशा साहसी स्पर्धांमध्ये सात पैकी फारतर चार नातवंडच सहभागी होतात. स्पर्धा संपल्यावर स्पर्धकांना सामुदायिकरित्या आयोडिन/बेंझिन वा चिकटपट्ट्या लावून त्यांच्या जखमांवर प्रेमाची फुंकर मारली

जाते. कधिकधी आति उत्साहात एखाद्या चरावरून एका उडीत पलिकडे जाण्याच्या प्रयत्नात एखादा वीर अथवा एखादी झाशीची राणी फदक्कन तीन फूट खोल असलेल्या चरात वा त्यातल्या चिखलात पडते व सर्व कपडे घाण करून घेते. आजोबांचं अशा साहसांना उत्तेजन असतं परंतु त्याकडे बारीक लक्षही असतं.

लाखभर अंब्याची झाडं एकत्र असलेली आमराई नातवंडांना जशी फार आवडते तशीच ती आजोबांनाही आवडते. इतकी रेखीव, आखीव, ओळीत शिस्तबद्ध लावलेली झाडं पहायलाही मिळत नाहती. ही आमराई आजोबांनी आपल्या करड्या शिस्तीत उभी केली असल्यानं तो कदाचित त्यांच्यापुरता भावनेचा विषय असूही शकेल पण नातवंडांचा नाही. ही आमराई जेव्हा फळांनी लगडते-बहरते तेव्हा फारच लोभसवाणी दिसते. मोहोराचा वास घेणं, जास्तीत जास्त मोहर लागलेलं झाड शोधणं असे उद्योग सर्वांनाच पुरतात. कैऱ्या धरल्यावर त्याचे रंग, आकार पहात पहात हिंडणं आलंच. उन्हाळ्यात कधीकाळी रात्रीत वादळ होऊन पाऊसही होतो वळवाचा. मग सकाळी समस्त बाळगोपाळांची पडलेल्या कैऱ्या वेचण्याची जी धांदल उडते ती पाहण्यासारखी असते. शेवटी हे आपल्या आवाक्यातलं काम नाही हे जाणल्यावर त्यातून अत्यंत निरशेनं, दुःखानं अंग काढून घेतानाचे त्यांचे चेहरे पाहवत नाहीत. या आमराईतून फिरताना मध्येच कुठ ठिबकची सुटलेली नळी जोड, पडलेला ड्रिपर परत खोचून ठेव, लहान रोपाला त्रास देणारं रानटी झाड उपट, वाकलेल्या फांदीला दोरीनं आधार दे अशी किरकोळ कामं चालू असतात. अशी कामं न सांगता करूनच टाकायचे. असा दंडक आहे आजोबांचा. त्यावरून कामचुकारपणा करणाऱ्यांची चुगली करणं, त्याला बोलणी खायला लावणं इत्यादी छक्केपंजे सतत चालू असतात.

आमराईच्या खालच्या अंगाला चार वेगवेगळ्या पेरूंच्या बागा आहेत. त्यामधून फिरायचा रस्ता जातो. जेव्हा पेरूचा हंगाम असतो तेव्हा निवडून पेरू तोडणं व तो तिथल्या तिथं खाऊन संपवणं चालूच असतं. पेरूच्याही कितीतरी जाती असल्यानं 'ॲपल पेरू' नावाची जात सगळ्याच नातवंडांची आवडती आहे. अगदी हुबेहूब सफरचंदासारखा गुलाबी लालसर रंग धारण करणारा हा पेरू चवीलाही मधूर असतो. आकारानं फार मोठा नसल्यानं संपूर्ण खाताही येतो. हंगाम संपल्यावर मात्र पानांच्या आड दडलेले दुर्मिळ पेरू शोधाशोध करून नंतर इतर सर्वांना टुकटुक करून तो एकट्यानं खाण्यातली गंमत नातवंडांमध्ये फारच पॉप्युलर आहे.

अशा या विस्तीर्ण हिरवाईत जंगली श्वापदं नसतील तरच नवलं. हमखास दिसणारे, त्यांचं ओरडणं ऐकू येणारे म्हणजे मोर. त्यांच्या 'पियू पियू' अशा ओरडण्याची नक्कल करण्याची स्पर्धाच लागते नातवंडांत. दोन टेकड्यांच्या मधील घळीत सोडून दिलेल्या नैसर्गिक जंगलात मधूनच एखादी रानडुक्करांची रांगच्या रांग मुसंडी मारत जोरात पळताना दिसते. कधीकधी ही वराहयात्रा अगदी जवळूनही भरधाव जाते. त्यांच्या जोडीला अधूनमधून दृष्टीस पडतात त्या नीलगायी. त्यांच्या कळपात लहान



पिल्लंही दिसतात. थोड्या लांबवरच्या जंगलात गेल्यावर थांबून शांतपणानं मागं वळून वळून आपला अंदाज घेण्याची त्यांची लकब आता बच्चेकंपनीला पाठ झालीय. करड्या रंगाचा एखादाच ससा टुणुक्कन उड्या मारत घनदाट जंगलात नाहीसा होताना दिसतो. वर्षातील काही ठराविक महिन्यात, विशेषतः उन्हाळ्यात हरणांचे कळप आंब्याच्या रांगांमधून लावलेल्या कांद्यांची हिरवीगार पात खायला येत असतात. भल्या पहाटे त्यांचे कळप अगदी जवळून पहाता येतात. एखाद् दिवशी रात्री १० नंतर खास हे वन्यप्राणी पहायला म्हणून जीपने समस्त बाळगोपाळ मंडळी बाहेर पडतात. फारच क्वचित त्यांची पूर्ण निराशा होत असते. नेहमी दिसणार एक असाच रहिवासी म्हणजे साप-नाग. पण त्यांचा कोणालाही त्रास नाही. विंचू मात्र खूपच आहेत. उन्हाळ्यात तर ते थेट खोल्यांमध्येही बिनधास्त येतात.

नातवंडांच्या हौशीसाठी आजोबांनी नौकानयनाचीही सोय केलीय. एकीकडं एक मोठा तलाव व त्यापासून दोन मैलांवर दोन शेजारी शेजारी असलेल्या तलावांची एक जोडी अशा एकूण तीन तलावांत हा आनंद घेता येतो. पायाने पेडल मारून चालवण्याची एक बोट आहे. त्यामध्ये जास्तीत जास्त चार माणसं एकावेळी बसू शकतात. मोठ्या उत्साहानं तिच्यात बसायचं, जोरानं पाय मारून बोट पाण्याच्या मध्यावर न्यायची व दमून भागून तिथंच तासभर बसायचं अशी अवस्था कित्येकदा होते नातवंडांची. आजोबांसहीत इतर सर्वजण मग त्यांची गंमत काठावरून पहात असतात. नौकानयनात सहभागी न होऊ शकलेली बाळगोपाळ मंडळी मग काठावरच्या गावरान चिंचेच्या झाडाकडं वळतात. अन् कारण नसताना पिशवीभर चिंचा काढतात. एक संपूर्ण चिंच खाणारा एकही वीर नसतो वा विरांगनाही सापडत नाही.

कधीकाळी षटीसामासी गोशाळेला भेट देण्याचा कार्यक्रम होतो. खरं पाहता ही गोशाळा जाण्यायेण्याचा वाटेवरच

आहे पण तिला आतमध्यें फिरून भेट देण्याचं काहीच खास प्रयोजन नसतं. जवळजवळ दोनएकशे गायी व त्यांची पांच पंचवीस वासरं तिथं असतात. नातवंडांच्या टीमला फक्त वासरांमध्ये इंटरेस्ट असतो. त्यातल्या त्यात नव्यानं जन्मलेल्या लहानात लहान वासरू उचलून छातीशी धरणं त्यांना भावतं. एखाद्या गोजिरवाण्या लहानग्या वासराला गोंजारण्यासाठी एखाद नातवंड धिटाईनं पुढं येतं अन तेवढ्यात ते वासरू एकतर गोमुत्राची चिरकांडी तरी उडवतं नाहीतर शेपटीच्या टोकाकडच्या केसांच्या झुपक्यानं क्षणात गोमुत्राचा स्प्रे मारून मोकळं होतं. अशा प्रसंगानंतर गोशाळेकडे आवर्जून फिरकण्यातला बाळगोपाळ मंळींचा उत्साह मावळतो. एखादं थोडंसं मोठं वासरू एकाएकी वारा पिऊन चौखूर उधळतं तेव्हा त्याच्याही दुप्पट वेगानं जेव्हा नातवंड उधळतात तेव्हा गंमत पाहण्यालायक असते. पण कसंही असलं तरी नेहमीच ही गोशाळा भेट चैतन्यमय ठरत असल्याने नातवंडांना तिथं येणं आवडतं.

आजोबांचं आजचं वय आहे ६७ वर्षांचं. आत्तापर्यंत त्यांना पाचवेळा लहान मोठे हार्ट ॲटॅकस येऊन गेलेत. दोन वेळा त्यांच्या बायपास शस्त्रक्रिया अमेरिकेत झाल्या आहेत. त्यामुळं त्यांच्या खाण्यापिण्यावर, वागण्यावर बंधनं आहेत. ते त्यातली किती मानतात, किती पाळतात हा विषय वेगळ्या चर्चेचा आहे. पण हृदयरोगाचा हा अत्यंत घातक मामला सोडला तर बाकी माणूस निरोगी आहे. इतर कोणताच त्रास नाही. आजोबांना एकूण चार मुलं. मुलगी नाही. चारही मुलं शिकली सवरलेली, कर्तव्यदक्ष, अत्यंत कामसू, पूर्णपणे निर्व्यसनी आहेत. त्याबाबतीत वडिलांच्या अगदी पायावर पाऊल आहे. थोरला अशोक, दुसरा अनिल, तिसरा अजित आणि शेंडेफळ अतूल. चारही जणांची लग्नं झालेली असून पहिल्या तिघांची मिळून ही एकूण सात नातवंड आहेत. सर्वात मोठं



नातवंड अथांग हा १२ वर्षांचा आहे व सर्वात लहान आत्मन हा फक्त ७ महिन्यांचा आहे. यामध्ये अमोली ११ वर्षांची, अभेद्य ९ वर्षांचा, आशुली ८ वर्षांची आरोही ७ वर्षांची आणि अभंग हा ४ वर्षांचा अशी पाचजणांच्या वयाच्या क्रमाने जागा आहेत. सात नातवंडांत सध्या ४ मुलं आणि ३ मुली आहेत. संपूर्ण कुटुंब जळगावमध्ये एकत्रितरित्या सुखात राहतंय. आजोबांना त्यांच्या पत्नीचीही साथ आहेच. तीर तर या भरल्या घराची घरी मालकीण. लक्ष्मी आहे.

हे घर तसं पाहू गेल्यास देरासर पंथी जैन धर्मियांचं आहे. साहजिकच या घरात मूर्तीपूजा नाही. पण म्हणून उत्तम संस्कारांसाठी कसलीच आडकाठी नाही. ७ वर्षांची आरोही या वयात गीतेचा अध्याय, गणपतीच्या आरत्या, नवकारमंत्र, संस्कृत श्लोक घडाघडा म्हणते. मुलांच्या वागण्यावर, बोलण्या चालण्यावर आजोबांच बारीक लक्ष असतं. वावगं वागणं वाटल्यास आजोबा त्या नातवंडाला तिथल्या तिथं सपाटून झापण्यापेक्षा तशा वागण्याच्या मूळ कारणांकडे जाणं पसंत करतात व शोध घेतात. गैरवर्तणूक, वाईट सवयी कुठून कशा आल्या, कशा येताहेत त्याचा तपास करातात. त्यासाठी त्यांना सर्वात जास्त मदत निरागसपणं नातवंडांच करतात. मग मित्र-मैत्रिणी, टी.व्ही., नात्यातली भावंडं असं जे काही कारण मिळेल त्याचा बंदोबस्त केला जातो. त्याआधी आजोबा त्या नातवंडांच्या आईला विश्वासात घेतात. समजावून सांगतात. मग मात्र कडक ॲक्शन. त्याला पर्याय नसतो.

सर्व नातवंडांच्या सकाळ-दुपार असणाऱ्या शाळा, नंतरचे स्पेशल क्लासेस, ट्यूशन आणि त्याचबरोबर आजोबांचाही असणारा अफाट व्याप यामुळं सकाळचा नाश्ता अन दुपारचं जेवण याचं प्रत्येकाचं वेगवेगळं वेळापत्रक असतं. कुणाचंच गणित दुसऱ्या कुणाशीच जमत नाही. म्हणून मग आजोबांनी एक झकास मार्ग काढलाय या सगळ्यामधून. संध्याकाळी ठीक साडेसात वाजता सर्व नातवंड व आजोबा घरी जेवायला एकत्र येतात. मात्र यामध्ये आजोबांच्या सुपुत्रांपैकी म्हणजेच नातवंडांच्यापैकी एकाच्याही तीर्थरूपांचा समावेश नसतो. ते बिचारे तिकडे कामाचे ढिगार उपशित असतात. या संध्याकाळच्या जेवणाचा प्रोटोकोल आखीव असतो. शिस्त कडक असते. नियम पहिला म्हणजे सगळ्यांनी मिळून एकाच थाळीत जेवायचं. जसजशी नातवंडांची संख्या अन त्यांच्या

मांड्यांचा आकार वाढत गेला तसतसा या थाळीचा आकारही वाढत गेला. आज ही थाळी सुमारे दोन फूट व्यासाएवढी भली मोठी आहे. नियम दुसरा– ताटात सर्व पदार्थ एकत्र वाढलेले राहतील व प्रत्येकाने त्यातले हवे ते हवे तितके घ्यावे. पोटभर जेवावे. पाण्याचे ग्लासेस मात्र प्रत्येकाचे वेगळे. जेवण शक्यतो जमिनीवर बसून व गोलाकार छोट्या स्टूलवर थाळी व त्याभोवती गोलाकार बसून. आजोबांचं मग प्रत्येकाच्या खाण्याकडं बारीक लक्ष राहतं. अशा जेवणात आवडी–निवडींना अजिबात वाव नसतो. 'मला हे आवडत नाही. ते नको' असे विषय मुळातच नाही व तसे कोणतेच लाड खपवून घेतले जात नाहीत. मुलांच्या आयांनाही त्यात अजिबात डोकावता येत नाही. सर्व नातवंडं आजोबांबरोबर, त्यांच्या धाकात पुढ्यात पडेल ते मुकाट्यानं खातात. दररोज खातात. एखाद्यानं कमी वा जास्त खाल्ल्यास त्याच्या आईला तिथल्या तिथं बोलावून सांगण्यात येतं. मुलांच्या मताने आठवड्यातला एक दिवस 'चुर्मा' जेवण केलं जातं. यामध्ये वरण, भात, भाज्या, आमट्या, सॅलॅड, कढी, चपात्या वा रोट्या असं जे जे म्हणून वाढलं जाईल त्याचा हाताने बारीक चुरा करून, कालवून त्याचा एकजीनसी गोळा करून तो खाल्ला जातो. त्यामुळे आवडीचे अन नावडीचे सर्व पदार्थ निमूटपणानं खाल्ले जातात. थोरली सर्व भावंडं एकत्रितरित्या जेवताना पाहून नुकतेच दात फुटलेलं नातवंडं आपोआपच रांगत रांगत त्यांच्या मागोमाग येतं अन दोन घास खांत. घरोघरी आयांना 'हा घास चिऊचा, हा घास काऊचा' असं म्हणत बाळांना भरवताना जो घाम फुटतो तो संपूर्ण विषयच या घरी किती किती सोप्या पद्धतीनं सोडवलायं ते पहाच. शिवाय कोणत्याही स्पेशल आवडी निवडी या मुळातच जोपासल्या न गेल्यानं ही नातवंडं मोठी झाल्यावर जगाच्या कोणत्या टोकालाही गेली तरी उपाशी राहणार नाहीत हे निःसंशय. या खेरीज एकाच ताटात वर्षानुवर्षे एकत्र जेवलेले जीव उत्तर आयुष्यात मनानंही किती जवळ येत असतील त्याचाही विचार करून पहावा. एकाच ताटात जेवणं ही खास काही ठराविक जाती जमातींची रीत–पद्धत आहेच. या पद्धतीचा बरेवाईटपणाचा विचार सोडा पण हा भावनात्मक दृष्टीकोन तथाकथित दोषांवर वरताण ठरतो हे बाकी खरंय.

भावंडां–भावंडामधील प्रेम हे साहचर्यामुळं वाढत ठेवण्याचा दुसरा एक जालीम उपाय या द्रष्ट्या आजोबांनी अनुसरलाय. तो म्हणजे सर्व नातवंड आजोबांबरोबर एकत्रितपणानं ओळीनं झोपतात. याचा सर्वात चांगला परिणाम असा होतो की सर्वात लहान नातवंड दोन वर्षांचं होई होईतो या बच्चे कंपनीच्या टोळीत आपणहून सामील होतं. त्या भावंडांच्या दंग्यात हे पिल्लू केव्हा सामील झालं हे त्यालाही कळत नाही. दुधाची बाटली तोडण्यासाठी, स्वतंत्रपणानं एकटं झोपायची सवय लावण्यासाठी, नव्या कोऱ्या आईबापांना किती कष्ट पडतात. काय काय करावं लागतं त्याचा जर आढावा घेतला तर त्या आजोबांचे या नातवंडाच्या आई वडिलांवर किती अनंत उपकार आहेत याचा अंदाज करता येणार नाही. बरं, खरं पाहता या आजोबांना यासाठी जे काही खरे कष्ट पडले, त्रास झाला तो



फक्त पहिल्या नातवंडाचे वेळीच. बाकीची नातवंड आपोआपच आपल्या पायांनी चालत चालत या परंपरेची पाईक झाली. आजोबांनी अपवाद केला नाही, शिस्त सांभाळली एवढंच.

वर्षातून एकदा सुटीमध्ये आजोबा नातवंडांना घेऊन दूरवर जातात. कधी जवळच्या मुरुड जंजिऱ्याला, कधी सिमला–कूलू–मनाली, कधी राजस्थान तर कधी म्हैसूर–बंगलोर–उटी–हैदराबाद. अशा सहलींमध्ये मुलांना भरपूर स्वातंत्र्य असतं. प्रेक्षणीय स्थळं पाहणं, विविधतेचं खाणं–पिणं, प्रवास यामधली गंमत, त्यातला आनंद ते त्यांना यथेच्छ लुटू देतात. अशा प्रेक्षणीय स्थळांची माहिती, पुस्तकं, सीडी मुलांना देतात. घरातला कॉम्प्युटर मुलं अगदी सहजपणानं हातळतात. नव्या युगातील ह्या लहानमोठ्या वस्तूंमुळं मुलं बुजून जाऊ नयेत याची आजोबा भरपूर काळजी घेतात.

कपड्यालत्त्यांचे बाबतीत आजोबांचे दृष्टीकोन अगदी काटेकोर आहेत. शाळांचे सर्व नियम, युनिफॉर्म, टाईमटेबल्स ही विनाअपवाद पाळावीच लागतात. जास्त भडक, उच्छृंखल, दिखाऊ, अंग दाखवणाऱ्या कपड्यांना पूर्ण बंदी आहे. चुकून जर असे कपडे कोणाच्या अंगावर दिसले तर ते घरात आणणाऱ्या व्यक्तीला समोर बोलावून जाब विचारला जातो. बऱ्याचदा अशा झाडाझडतीत मुलांच्या आयांपेक्षा त्यांचे बापच सापडतात. पण मग तिथं वशिलेबाजी नसते. आरडाओरडा होतोच.

आजोबांची वागण्याची रीत ही 'आधी केले आणि मग सांगितले' अशी आहे. वागण्यात नम्रता, साधेपणा, निगर्विता असते. वयानं मोठ्या असलेल्या मंडळींना वाकून पाया पडण्यात संकोच नसतो. आलेल्या प्रत्येक पै–पाहुण्यांची विचारपूस करून त्यांच्यांशी दोन शब्द बोलणं हे ते कर्तव्याचा भग मानतात. नातवंडांकडूनही तशी अपेक्षा बाळगतात व ती पुरी करून घेतात. आत्तापर्यंत तरी आजोबा नातवंडांवर रागावलेले सर्वांनी कित्येकदा पाहिलेत. काही वेळा त्यांनी

नातवंडाला हातानं, छडीनं मारलंय असं कधीच झालेलं नाही. खरं पाहता हे वागणं फारच विरळ म्हणायला हवं. कारण आजोबांच्या अशिक्षित आईनं त्यांना यथेच्छ बडवलं होतं. वडील तर साक्षात जमदग्नीचेच अवतार होते. आज या आजोबांचं कर्तृत्व, दरारा, वय अधिकार यांचा विचार करता त्यांनी एखाद्या वांड नातवंडाला एखादेवेळेस फटकारलं तर काहीच वावगं होणार नाही. पण तसंही होत नाही हे विशेष.

माणसाचं कॅरॅक्टर हे घडवायला लागतं. आणि ते घडवणं वर्षानुवर्षे चिवटपणानं, अथक प्रयत्नांनी व्हावं लागतं याची आजोबांना पूर्ण जाणीव आहे. म्हणून ते याबाबत फारच संवेदनशील आहेत. सकाळच्या प्रभातफेरीत ते नातवंडांना असंख्य गोष्टींची माहिती देत राहतात. तसंच न चुकता नातवंडांच्या बारीक सारिक प्रश्नांनाही व्यवस्थित उत्तर देत राहतात. त्यांचे प्रश्न मग कितीही फालतू वा बावळटपणाचे असले तरीही. 'जिज्ञासा' ही चीज वाढविण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. ती ते कधीच मारून टाकत नाहीत. या धडपडीपोटीच त्यांनी विदेशातून 'हंड्रेड ग्रेट मेन इन दी वर्ल्ड' सारखी महागडी पुस्तके, सीडी, टेप्स आणल्या आहेत. त्याचा नीट वापर करून घेण्याइतपत नातवंड जाणती झालेली नाहीत हे खरंच. परंतु आजोबांनी जाणतेपणानं अशी मोर्चेबांधणी आधीच केलेली आहे.

व्यक्तिमत्व घडवताना चौफेर प्रगती होणं आवश्यक असतं म्हणून आजोबा सर्व नातवंडाच्या शालेय प्रगतीवर लक्ष ठेवून असतात. मुलींना डान्सच्या क्लासला त्यांनीच उत्तेजन दिलंय. मुलांना संध्याकाळच्या बास्केटबॉल ट्रेनिंगला घातलंय. त्या निमित्तानं व्यायामही होईल ही भावना. मुला-मुलींनी पाठांतरांच्या, वक्तृत्वाच्या, खेळांच्या, चित्रकलेच्या, गाण्याच्या स्पर्धात भाग घेणं ते जितकं महत्वाचं मानतात तितकंच त्यांनी स्कॉलरशिपच्या परिक्षेला बसणं महत्वाचं मानतात. नातवंडांच्या वार्षिक स्नेहसंम्मेलनाच्या कार्यक्रमांना ते इतर सर्व महत्वाची कामं बाजूला सारून अग्रक्रमानं उपस्थिती देतात व अत्यंत चिवटपणानं तीन-तीन तास बसून राहतात. ज्या गाण्यात, नाचांत, नाट्यात, एकांकिकेत आपल्या नातवंडांचा सहभाग असेल ते प्रयोग जास्त बारकाईनं पाहतात व घरी आल्यांवर न चुकता नातवंडांचा जाहीर कौतुक करतात. त्यामुळं सर्व नातवंडांना आजोबा आपलेसे वाटतात. त्याचा प्रत्ययही लगेचच येत असतो. अगदी बुटाची नाडी बांधण्यापर्यंतची कामंही नातवंडं 'आपल्या आजोबांना' बिनधास्त सांगत असतात.

आजोबांनी कटाक्षानं पाळलेलं एक सूत्र लक्षात घेतलंच पाहिजे ते म्हणजे कोणत्याही नातवंडाचे हातात कोणत्याही कारणास्तव कधीही पैसे असत नाहीत. तशी शिस्त आहे. तसं पाहता या घराला पैशांची काहीच कमी नाही पण म्हणून पैशांबाबत किंचितही बेफिकीरी नाही. नातवंडांच्या सर्व गरजांची पूर्तता केली जाते. परंतु गावामध्ये विनाकारण हिंडणं, हॉटेलात खाणं, गाडीवरचं खाणं याला पूर्ण बंदी असल्यानं पैसा हाती असण्याची गरज नसते. तशातही काही खास कारणानं पैशांची गरज नातवंडांना लागलीच तर त्यांच्या आया ते पाहतात. पण बच्चेकंपनीकडं कधीही पैसे नसतात- घरापुढं नेहमीच स्वत:ची हवी तितकी वाहनं नेहमीच उपलब्ध असल्यानं प्रवासासाठीही कधीच रोख पैशांची गरज लागत नाही. आणि तसं पाहिलं गेल्यास स्वत: आजोबा नेहमीच कफल्लक असता म्हणजे अगदी अमेरिका वारी झाली तरी प्रत्यक्ष नोटांना त्यांचा स्पर्श होतो किंवा नाही हा संशोधनाचाच विषय होईल. ते कधीही स्वत:कडे पैसे बाळगत नाहीत.

गेल्याच वर्षी कुठून जाणे पण 'मुक्तांगण शिबीराची' कल्पना कोणीतरी या आजोबांच्या मनात घुसवली. पहिल्याच फटक्यात ती तिथं खोलवर रुजली. प्रामुख्याने हे शिबीर त्यांच्या स्वत:च्या नातवंडांसाठीच होतं. त्यामध्ये मुलांबरोबर मुलींचाही समावेश होता. तीन रात्री अन तीन दिवस उघड्यावर तंबू ठोकून रहायचं. सर्व दिनक्रम तिथूनच उरकायचे. त्या तीन दिवसांत 'जंगल भ्रमंती, कडा-चढणे, निसर्ग-परिचय, स्वालंबन' इत्यादी विषय अंतर्भूत होते. स्वत:चे कपडे स्वत: धुणे, सगळ्यांचा स्वयपांक एकत्र करणे, जंगलात प्रातर्विधी उरकणे, आंघोळीला फाटा देणे, रात्री तंबूत झोपणे अशा गोष्टी होत्या. या शिबिरासाठी गावातून निमंत्रित करून एका अनुभवी शिक्षकास नेतृत्व दिले गेले. या शिबीराचे स्वरूप नीट यावे गावातील नातेवाईकांची याच वयोगटातील काही मुले-मुली मुद्दाम निमंत्रित करून शिबीराचा गोंडसपणा वाढवला गेला. पहिलेच शिबीर असल्यानं ते राहत्या टेकड्यांच्या सानिध्यातच मांडलं गेलं. शिबीर छोटेखानी होतं. तरीही कमालीबाहेर यशस्वी झाले. सर्व नातवंडं 'बहोत खुष' झाली. खाण्यापिण्याचे जरा हाल


*With Best Compliments From*

# SHIVASAGAR

Ram Maruti Road, Thane (W.)

✆ 25363216/55921668

झाले, भरपूर चाल पडली, प्रचंड दमणूकही झाली तथापि जे मुक्त वारं पोरांना मिळालं ते पिऊन ती मस्तच उंडारली. उन्हाळ्याच्या सुट्टीतला आजोबा प्रणित हा झटका सगळ्यांनाच आवडला. नातवंडांमध्ये जिगर निर्माण व्हावी, टक्कर देण्याची वृत्ती निर्माण व्हावी, पंखांखाली हे पाहिलं शिबीर घेतलं होतं. यापुढं अशी शिबीरं घरापासून थेट शे दोनशे मैलांवर घेण्याचा त्यांचा विचार आहे.

आजोबांची स्वत:ची मातृभाषा मारवाडी. ती अर्थातच ते उत्तमरित्या बोलतात. तथापि त्यांचं स्वत:चं संपूर्ण शिक्षण मराठी-इंग्रजी माध्यमातून झालेलं असल्यानं त्या दोन्ही भाषांवर त्यांचं असामान्य प्रभुत्व आहे. वाचनाची भरपूर आवड असल्यानं भाषेचा कसही चांगलाच आहे. जरूरी पुरतं चांगलं हिंदी-गुजरातीही ते बोलू शकात. नातवंडांशी ते मारवाडीतूनच बोलतात. आता सर्व नातवंड इंग्लिश माध्यमांच्या शाळांत जातात. मारवाडी-इंग्लिश-हिंदी अशा त्रिकोणात मराठीला स्थानच नाही. त्यामुळं नातवंडांना मराठी जरी येत असलं तरी ते जुजबीच. आजूबाजूला वावरणारी मराठी माणसं, गडीमाणसं, वर्तमानपत्रं, मराठी चॅनेलस् इत्यादींच्या एकत्रित परिणांमांमुळं मराठी भाषेशी सर्वात जास्त संपर्क येतो व राहतोही. हीच नातवंड उद्या मोठी झाल्यावर उद्योग पसारा सांभाळणार आहेत व तोही फक्त महाराष्ट्रातच आहे हे सत्य आता आजोबांना उमगू लागल्यानं मराठी भाषेशी फारच जुजबी संपर्क राहिल्यानं जेमतेम मराठी बोलू-वाचू-लिहू शकणाऱ्या नातवंडांचा मराठी भाषेचा स्तर उंचावण्याचा आजोबांनी निर्धार केलाय आणि तसे जाणीवपूर्वक प्रयत्नही सुरू आहेत. नातवंडं अर्थातच या प्रयत्नांना साथ देताहेत. नुकताच 'श्वास' हा चित्रपट या कुटुंबानं एकत्रितरित्या बसून पाहिला. नातवंडांना तेव्हा 'श्वास' शब्दापासून अडचणी आल्या. म्हणून मग त्यात प्रश्नाचं गांभीर्य आजोबांना जास्त प्रकर्षानं जाणवलं असावं. परप्रांतामधून आलेल्या दोन सुनाही आता उत्तमरित्या मराठी बोलू लागल्या असल्यानं हा प्रश्न वाटतो तितकं गंभीर स्वरूप धारण करणार नाही अशी आजोबांची खात्रीच आहे. मात्र काळच याचं खरं उत्तर देईल.

आजोबांना त्यांच्यात अन त्यांच्या मुलांमध्ये अस्तित्वात असणारी 'जनरेशन गॅप' परत एकदा वाढीव प्रमाणात व नव्या स्वरूपात त्यांच्यात व त्यांच्या नातवंडांत पडू नये अशी प्रामाणिक व तीव्र इच्छा आहे. आजोबांची मुलं नव्या युगाचं प्रतिनिधित्व करतात. तरीही त्यांचं वागणं आजोबांच्या शिस्तीच्या कडव्या चौकडीत बसण्यासारखं आहे. आजही आहे. ती पूर्णपणे निर्व्यसनी आहेत. हॉटेलिंग, सिनेमा, नाटक, करमणूक, हॉलिडे-टूर इत्यादीसाठी त्यांचेकडे वेळ नसतो. खरं पाहता आजोबांच्या अपेक्षेप्रमाणंच सर्व चारही मुलं 'वर्को हॉलिक्सच' आहेत, ती तशी घडवली गेली आहेत. आता पाळी नातवंडांची आहे. आजोबांना उमेद आहे.

संपूर्ण आयुष्य अविरत, अखंड काम आणि कामच केलेल्या आजोबांच्या जीवनात त्यामुळंच साहित्य, कला, संस्कृती, करमणूक, मनोरंजन यांना अजिबात स्थान नव्हते. नंतर त्यांना हृदरोग जडला. दोन वेळा बायपास शस्त्रक्रीया झाल्या. एकूण पाचवेळा हृदयविकाराचे तीव्र झटके बसले. यामुळं त्यांच्या शरीरावर, धंद्यावर काय परिणाम झाला हे क्षणभर बाजूस ठेवले तरी त्यांच्या मनावर निश्चितच खोलवर परिणाम झाला. आयुष्याबाबतच्या त्यांच्या दृष्टीकोनात उदारीकरणाचा प्रसन्न शिडकाव झाला. मनाची कवाडं जगासाठी पूर्णपणे जरी उघडली गेली नाही तरी ती किलकिली निश्चितच झाली.

नातवंडांच्या, सुनांच्या नव्या पिढीनं हा रेटा आणखी वाढवला अन त्यात आजोबांच्या वाढत्या वयानंही हातभार लावला. या सगळ्यांचा एकत्रित फायदा आता नातवंडांना उपभोगायला मिळतोय. प्रेमळ आजोबांच्या खोल खोल हृदयात दबून राहिलेला प्रेमाचा, आनंदाचा, सुखशोधांचा झरा वाहू लागलाय. भले त्यांची मुलं त्यापासून वंचित राहिली होती पण नातवंड मात्र निश्चितच राहिली नाही. त्यांच ते भाग्यच म्हणायचं. येणारा प्रत्येक दिवस, उगवणारा नवा नवा सूर्य आता आजोबांमधील सुमधूर परिवर्तनाला साक्षी आहे.

आजोबांच्या कर्तृत्वाचे नगारे जगभर वाजताहेतच, यानंतरही ते अधिक मोठ्याने वाजतील पण आज तरी नातवंडांना त्यातला एकही स्वर ऐकू येत नाहीये. आणि आला तरीही तो समजण्याइतकी जाण त्यांना आलेली नाहीये. मातीच्या भांड्यांना आकार देण्याचं काम चालू आहे. ते पूर्ण झाल्यावर ती भांडी जगाच्या भट्टीत भाजली जातील तेव्हा कुठं त्यांच्यात आजोबांच्या कर्तृत्वाची जाण साठेल. आज तरी त्यांचा आजोबा हा एक सर्वसाधारण, साधासुधा माणूस आहे. त्यांच्यावर मनापासून प्रेम करणारा माणूस आहे. त्यांच्या हक्काचा माणूस आहे. बस्स इतकंच.

❑

आनंद गुप्ते : 'अमृती',
७०, श्रीकृष्णनगर, बोरिवली (पूर्व),
मुंबई - ४०००६६.
फोन : २८९७४९३१

